# 3.5- Collaboration

**3.5.2.1**

## ***Functional MoU's with institutions, other universities, industries, corporate houses***

# DRAFT OF MOU'S

# 2018-19

# MOU WITH JANASWASTH DAKSHATA SAMITI

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA © 2018 © TZ 058002

दिनांक 3 JAN 2019 वि.क्र. १०९२८ मुद्रांक शुल्क रक्कम - १००/—

दस्त नोंद करणार आहे का-होय/नाही, नोंदणी होणारे दु.नि. कार्या.

दस्ताचा प्रकार / अनुच्छेद क्रमांक / कारण शैक्षणिक कार्य

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता - प्राचार्य नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर

दुसऱ्या पक्षकाराचे नांव व पत्ता -

हस्ते नांव व पत्ता - बृहस्पती रामभाऊ शिंदे, कोल्हापूर

मोबदला रक्कम - मिळकतीचे वर्णन -

मुद्रांक विक्रेत्याची सही -

परवाना धारक मुद्रांक विक्रीचे ठिकाण नांव व पत्ता - किशोर बाळकृष्ण खोतलांडे (स्टँप व्हेंडर) ला. नं. ३७/८८

फोन नं. २६०१०३५, सि.स.नं.२०८४, सी वॉर्ड, कोल्हापूर

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही =

19 DEC 2018

STAMP HEAD CLERK
TREASURY OFFICE
KOLHAPUR (M.S.)

सामंजस्य करार

MEMORANDUM OF UNDERSTANDING

नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर

आणि

जनस्वास्थ्य दक्षता समिती, कोल्हापूर

नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूरची स्थापना थोर स्वातंत्र्यसेनानी पद्मश्री देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार यांनी १९७१ साली केली. दिवसा काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना रात्रीच्या वेळी शिकण्यासाठी व स्वतःचे भविष्य घडविण्यासाठी नाइट कॉलेज स्थापन केले गेले. कला व वाणिज्य शाखांमध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षण येथे दिले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविणाऱ्या नाइट कॉलेजने आपला स्वतंत्र ठसा निर्माण केला आहे.

जनस्वास्थ्य दक्षता समिती, कोल्हापूर या सामाजिक सेवाभावी संस्थेची स्थापना १९९५ साली ज्येष्ठ समाजसेवक भाई सुरेश शिपूरकर यांनी केली. आरोग्य, पर्यावरण आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या क्षेत्रांमध्ये विविध उपक्रम, शाळा कॉलेजांच्या माध्यमातून राबवून एक निकोप, निरोगी, विज्ञाननिष्ठ व पर्यावरणपूरक समाज निर्माण करण्याचा संस्थेचा उद्देश आहे. यासाठी संस्था सामंजस्य कराराच्या माध्यमातून आपले कार्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील आहे.

**वरील दोन्ही संस्था परस्पर सहयोगाने सामूहिकपणे विविध उपक्रम राबविण्यासाठी दि. ३ जानेवारी २०१९ रोजी सामंजस्य करार करीत आहेत.**

- **या कराराची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत –**

१. व्यसनमुक्तीसाठी विद्यार्थी व समाजामध्ये विविध उपक्रम राबविणे.

२. आरोग्य, पर्यावरण, वैज्ञानिक दृष्टिकोनविषयक जाणीव जागृती करण्यासाठी प्रयत्न करणे.

३. सर्व प्रकारच्या प्रदूषणापासून मुक्ततेसाठी कृतिशील प्रयत्न करणे.

४. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक, वैज्ञानिक जाणिवा निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण शिबिरे, व्याख्याने, प्रदर्शने, पथनाट्ये, अभ्यास सहली, विविध स्पर्धा वगैरे उपक्रम राबविणे.

५. विद्यार्थ्यांमध्ये व समाजामध्ये पर्यावरणपूरक जीवनशैली रुजविणे.

६. आरोग्य, पर्यावरण, वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा अभ्यास व प्रसारासाठी संशोधन केंद्र सुरू करणे.

७. मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमातून समाजप्रबोधन करणे.

८. विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या आरोग्यविषयक समस्या, लैंगिक समस्या आदींचा अभ्यास करून त्यांच्यामध्ये आरोग्य साक्षरता निर्माण करणे.

९. भारतीय संविधानाला अभिप्रेत आधुनिक विज्ञाननिष्ठ, ज्ञानाधिष्ठित समाज निर्माण करणे.

१०. दोन्ही संस्थांच्या उद्दिष्टांनुरूप आवश्यक ते उपक्रम राबविणे

- **सामंजस्य कराराच्या माध्यमातून राबविण्याचे उपक्रम**

१. आरोग्य, पर्यावरण आणि वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण शिबिरे, स्वच्छता मोहीम, मानवी साखळी, व्यसनमुक्ती आंदोलन, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा इत्यादी उपक्रम राबविणे.

२. प्रदूषण मुक्तीसाठी फटाक्यांविरोधात मोहीम, प्लास्टिक बंदी, इंधन वाचवा, प्रदूषण मुक्त वाहतुक इत्यादी उपक्रम राबविणे.

३. व्यसनमुक्तीसंदर्भात प्रबोधन करणे. व्यसनांमुळे होणाऱ्या आजारांबाबत जागृती निर्माण करणे.

४. व्यसनमुक्ती व दारुबंदी चळवळ राबविणे. गुटखा, तंबाखू मुक्तीसाठी विशेष प्रयत्न करणे.

५. व्यसनमुक्ती सल्ला केंद्र चालविणे.

६. पर्यावरणपूरक जीवनपद्धती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे. आनंदवनाच्या धर्तीवर इको फ्रेंडली घरांची संकल्पना रुजविणे

७. विविध उपक्रम आयोजित करण्यासाठी बैठका, चर्चा, विचारविनिमय करून निर्णय घेणे. वर्षभराचे नियोजन करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करणे.

८. दोन्ही संस्थांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे.

९. शासन, सेवाभावी संस्था, शैक्षणिक संस्था, शाळा, महाविद्यालये यांच्या सहयोगाने विविध उपक्रम राबविणे.

- **आर्थिक व कायदेशीर बाबी**

१. सदर सामंजस्य करार दोन्ही संस्थांचे पदाधिकारी परस्पर सहमतीने व कायदेशीररीत्या बांधील राहून करीत आहेत.

२. सामंजस्य करारातील उद्दिष्टांची अंमलबजावणी करण्यासाठी व वेगवेगळे उपक्रम राबविण्यासाठी दोन्ही संस्थांचे पदाधिकारी रीतसर बैठका घेऊन व त्यांच्या नोंदी ठेवून अंमजबजावणी करतील. प्रत्येक कार्यक्रमाची माहिती परस्परांना दिली जाईल. त्या संदर्भातील कागदपत्रांचे आदानप्रदान केले जाईल.



NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE KOLHAPUR

३. सामंजस्य करारांतर्गत उपक्रमासाठीचा खर्च त्या त्या संस्थेने स्वतः करायचा आहे. संयुक्तपणे खर्च करावयाचा असल्यास त्या संदर्भात पदाधिकारी बैठकीत निर्णय घेतील. कार्यक्रमास उपस्थित दोन्ही संस्थांच्या कोणत्याही सदस्यास कोणत्याही प्रकारचा भत्ता देय असणार नाही.

४. कोणत्याही संस्थेला एकतर्फी करार संपुष्टात आणता येणार नाही.

५. करार संपुष्टात आणणे, कराराचे नूतनीकरण करणे यासाठी साठ दिवसांची पूर्वसूचना देऊन विशेष बैठकीचे आयोजन केले जाईल व त्या नंतर कायदेशीर बाबींची पूर्तता करून कराराबाबत निर्णय घेता येईल.

६. सामंजस्य कराराची उद्दिष्टे व अंमलबजावणीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे सर्व अधिकार या कराराची अंमलबजावणी करणाऱ्या दोन्ही संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना देण्यात येत आहेत.

७. सदर सामंजस्य कराराचा कालावधी आज दि. ३ जानेवारी २०१९ पासून दि. २ जानेवारी २०२४ पर्यंत म्हणजे पाच वर्षांचा आहे.

८. सदर कराराची अंमलबजावणी करण्यासाठी नाइट कॉलेजचे प्राचार्य वा त्यांनी नियुक्त केलेले प्राध्यापक तसेच जनस्वास्थ्य दक्षता समितीचे अध्यक्ष वा कार्यवाह हे संयुक्तपणे काम पाहतील.

९. सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटींशी अधीन राहून दोन प्रतींमध्ये अंमलात येत आहे.

| डॉ. अरुण शिंदे | डॉ. एस. बी. पाटील | दीपक देवलापूरकर | बृहस्पति शिंदे |
|---|---|---|---|
| समन्वयक | प्राचार्य | अध्यक्ष | कार्यवाह |

प्राचार्य
नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स
कोल्हापूर

नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर — जनस्वास्थ्य दक्षता समिती, कोल्हापूर